1 8 MAR 2023
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या सामाजिक न्यायविषयक मूल्यांचे संविधानात प्रतिबिंब


## लक्ष्मीकांत देशमुख : राजर्षी शाहू स्मृती परिषद व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : राजर्षी शाहू महाराजांनी केलेले कायदे सामाजिक परिवर्तन आणि न्यायाचे उत्तम निदर्शक आहेत. त्यांनी रुजविलेल्या सामाजिक न्यायविषयक मूल्यांचे प्रतिबिंब भारतीय संविधानात उमटल्याचे दिसून येते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे शाहू संशोधन केंद्र आणि इतिहास अधिविभाग यांच्यातर्फे विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीत आयोजित दोनदिवसीय राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या समारोप समारंभात 'राजर्षी शाहू आणि भारतीय संविधान' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार होते.

देशमुख म्हणाले, शाहू महाराज यांनी स्त्री शिक्षणासह स्त्रियांवरील अत्याचार दूर करण्यासाठी केलेले कायदेही काळाच्या खूप पुढे होते. आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाहांच्या नोंदीचा कायदा, विधवा पुनर्विवाह कायदा हे त्यांचा स्त्रियांकडे पाहण्याचा उदात्त मानवतावादी दृष्टिकोनच दर्शवितात.



शिवाजी विद्यापीठातील राजर्षी शाहू स्मृती शताब्दी परिषदेच्या व्याख्यानमालेचा डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी समारोप केला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. जयसिंगराव पवार म्हणाले, कल्याणकारी राज्यव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न शाहू महाराज यांनी केला. करवीर संस्थान हे आधुनिक महाराष्ट्राचे तीर्थक्षेत्रच म्हणावे लागेल. तळागाळातील माणसे समृद्ध करण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले.

### ब्राह्मणेतर चळवळीचा राजकारणावर प्रभाव

राजर्षी शाहू महाराज यांनी सत्यशोधक चळवळीला मोठे बळ दिले. तिच्या व्यापक आधारावरच पुढे ब्राह्मणेतर चळवळ गतीने फोफावली आणि महाराष्ट्राच्या राजकारणावर तिने मोठा प्रभाव टाकला, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर यांनी 'शाहू महाराज आणि ब्राह्मणेतर चळवळ' या विषयावर बोलताना केले.

18 MAR 2023
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘कुसुमाग्रजांच्या शोधात..सौमित्र’ ने भारावले रसिक!

## शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम : कविता, नाटक आणि जगण्याचा सहसंबंध उलघडणारा अविष्कार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शंभराव्या प्रयोगाची मांड पहिल्यातच बसू दे, फुटू दे तरी इंद्रधनुष्य नवनवीन प्रयोगा-प्रयोगी एक तरी क्षण जिवंत होऊ दे... असू दे भान सतत जागं, माझं मलाच विंगेतून पाहता येऊ दे... घडता घडता नाटक सहज घडू दे... पडदा नेहमी नेमका पडू दे...दिपवू नकोस डोळे अंधारातून प्रकाशात, जगण्याच्या गदारोळात सहज मिसळता येऊ दे... रस्ता आणि पाय मला दोन्ही आवडू देत... शेवटी माझा मला मी पुन्हा एकदा सापडू दे...' अशी 'नटराजाप्रती एका नटाची प्रार्थना' या स्वरचित कवितेने सुप्रसिद्ध कवी सौमित्र तथा अभिनेते किशोर कदम यांनी 'कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र या त्यांच्या काव्य-नाट्याची नांदी शिवाजी विद्यापीठात केली. पुढची ५० मिनिटे रसिकांना खिळवून ठेवले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या कवी कुसुमाग्रज स्मृती व्याख्यानमालेचे!

मराठी अधिविभागाने व्याख्यानमालेअंतर्गत कवी सौमित्र यांना विषय दिला 'कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र. मात्र, या विषयाने कवी सौमित्र यांच्या संवेदनशील मनाला वेगळीच दिशा दिली. एक आगळा काव्य-नाट्याविष्कार सादरीकरणात कवी कुसुमाग्रज आणि नाटककार वि.वा. शिरवाडकर या दोघांमधला धागा उलगडण्याचा प्रयत्न करत असतानाच कवी सौमित्र यांनी आपले काव्यविश्व, अभिनय आणि रंगभूमी यांच्याशी त्यांचे नाते जोडून पाहण्याचा प्रयत्न केला. या सादरीकरणामध्ये कुसुमाग्रजांच्या नाटकांतील काही प्रवेश, काही स्वगतं, काही कुसुमाग्रजांच्या, काही स्वतःच्या तर काही अन्य कवींच्या कवितांचाही समावेश होता. या सर्व बाबींची गुंफण सौमित्र यांनी इतक्या अनोख्या पद्धतीने केली की रसिकांना एका सलग आणि सुसूत्र सादरीकरणाचा आनंद मिळाला. माणसाचं कलेशी, कवितेशी, नाटकाशी असणारं नातं, त्यातून समृद्ध होत जाणारं जगणं आणि त्या जगण्यामध्ये संवेदनशील माणूसपण जपण्याचे महत्व उलगडून दाखविणारा असा काव्य-नाट्यानुभव विद्यापीठाच्या मंचावर प्रथमच साकारला गेला.

तत्पूर्वी, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे आणि कदम यांच्या हस्ते कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्प वाहून अभिवादन करण्यात आले.



**कुसुमाग्रजांच्या कविता, नाटक आणि जगसंबंध उलघडवून दाखविताना सौमित्र.**

18 MAR 2023

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठचा संघ ठरला सबसे तेज

## अ. भा. आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत प्रथमच मिळवले सर्वसाधारण विजेतेपद, धावपटूंकडून १३ पदकांची कमाई

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा विभागाचा इतिहास सुवर्णअक्षरांनी लिहावा लागेल, अशी कामगिरी शिवाजी विद्यापीठाच्या संघाने चेन्नई येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत केली आहे. संपूर्ण स्पर्धेत चार-पाच नव्हे तर तब्बल १३ सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकांची कमाई करत विद्यापीठ संघाने सर्वसाधारण विजेतेपद खेचून आणले आहे. विद्यापीठाच्या इतिहासातील हे पहिले विजेतेपद आहे.



चेन्नई : येथे झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत चांगली कामगिरी करत १३ पदकांसह सर्वसाधारण विजेतेपद खेचून आणलेला शिवाजी विद्यापीठाचा संघ.

स्पर्धेत मुलींच्या २१ किलो मीटर हाफ मॅरेथॉनमध्ये रेश्मा केवटेने शानदार धाव करत सुवर्णपदकावर आपली मोहोर उमटवली. तीने १० हजार मीटर धावणेतही कांस्य पदक मिळवले आहे. मुलांच्या गटात २१ किलो मीटर हाफ मॅरेथॉनमध्ये विवेक मोरेनेही रौप्य पदकाला गवसणी घातली आहे. त्याने १० हजार मीटर धावणेतही वेगवान कामगिरी करत रौप्य पदकावर कब्जा केला आहे. तामिळनाडू फिजिकल एज्युकेशन ॲण्ड स्पोर्टस् विद्यापीठाच्या मैदानात ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत संपूर्ण भारतातून १७८ विद्यापीठांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेच्या १०० मीटर धावणे प्रकारात सुदेक्षणा शिवणकरने वेगवान धाव करत सुवर्णपदक पटकावले. तसेच २०० मीटर धावणेतही तीने रौप्य पदक मिळवले. अनुष्का कुंभारनेही अतिशय अवघड अशा ४०० मीटर अडथळा शर्यत (हर्डल्स) स्पर्धेत रौप्यपदक तर ८०० मीटर धावणेत रोहिणी पाटीलने व ५ हजार मीटर धावणे स्पर्धेत उत्तम पाटीलने कांस्य पदकावर कब्जा केला. प्राजक्ता शिंदेने दमदार कामगिरी करत १० हजार मीटर धावणेत रौप्य व ५ हजार मीटर धावणेत कांस्य पदकाला गवसणी घातली. सुशांत जेधेने अतिशय अवघड समजल्या जाणाऱ्या ३ हजार मीटर ट्रिपल चेस धावणेत तर कुशल मोहितेने डकेथलॉन स्पर्धेत प्रत्येकी १ कांस्य पदक पटकावत शिवाजी विद्यापीठाचा राष्ट्रीय पातळीवर डंका वाजवला. बक्षीस वितरण समारंभात विद्यापीठाच्या संघाला मोठा चषक देऊन गौरवण्यात आले आहे. स्पर्धेत पदक प्राप्त सर्व धावपटूंना शिवाजी विद्यापीठ क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, संघ व्यवस्थापक डॉ. सविता भोसले व प्रशिक्षक डॉ. इब्राहिम मुल्ला, संघ निवड समितीचे प्रमुख रामा पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.

पुढारी



कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत सर्वसाधरण विजेतेपद पटकाविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ.

# शिवाजी विद्यापीठाला जनरल चॅम्पियनशिप

**अखिल भारतीय ॲथलेटिक्स स्पर्धा**

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

चेन्नई येथे झालेल्या ८२ व्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ ॲथलेटिक्स स्पर्धेत कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने जनरल चॅम्पियनशिप पटकावली. सर्वाधिक ९१ गुणांची कमाई करत शिवाजी विद्यापीठाने हे यश मिळविले.

स्पर्धेत सुदेष्णा शिवणकर हिने १०० मीटर धावणे प्रकारात प्रथम तर २०० मीटर प्रकारात द्वितीय क्रमांक पटकावला. अनुष्का कुंभारने ४०० मीटर हर्डल्समध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. रोहिणी पाटीलने ८०० मीटर धावणे प्रकारात तृतीय क्रमांक पटकाविला. प्राजक्ता शिंदे हिने १० हजार मीटर धावणे प्रकारात द्वितीय तर ५ हजार मीटर प्रकारात तृतीय क्रमांक पटकावला. रेश्मा केवटेने २१ कि.मी. धावणे प्रकारात प्रथम आणि १० हजार मीटर धावणे प्रकारात तृतीय क्रमांक मिळविला. उत्तम पाटीलने ५ हजार मीटर धावणे प्रकारात तृतीय, सुशांत जेधे ३ हजार मीटर तृतीय, विवेक मोरे २१ कि.मी. द्वितीय व १० हजार मीटर द्वितीय क्रमांक पटकावला. कुशल मोहितेने डेकेथलॉनमध्ये द्वितीय क्रमांक पटकाविला.

times of india

# SUK ranks 1st in all-India athletics meet

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: The Shivaji University Kolhapur (SUK) has won the general championship at the All India Inter-University Athletics Meet held in Chennai.

The contingent of the university bagged 91 points while Madras University ranked second with 87 points. For the first time in the history of the athletics meet, SUK has bagged the overall championship.

SUK student Sudeshna Hanmant Shivankar came first in 200 m running while came Reshma Kevate ranked one in the 21 km race and second in 10,000 m.

Manushka Kumbhar, Prajakta Shinde and Vivek More bagged two medals each in various events. The event was organised by Tamil Nadu Physical Education and Sports Department.

सकाळ

आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

# मुंबई, नागपूर, पुणे, नांदेड संघ विजयी

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठातील महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत आज पाचव्या दिवशी मुंबई, नागपूर, पुणे, नांदेड विद्यापीठांच्या संघांनी प्रतिस्पर्धी संघावर विजय मिळविला.



आजच्या पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने जळगावच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठावर सात गडी राखून विजय मिळविला. जळगावने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. १८.३ षटकांत सर्व बाद ११६ धावा ते करू शकले. मुंबई विद्यापीठाने ९.४ षटकांत तीन गडी गमावून १२० धावा केल्या. मुंबईचे संजय पवार सामनावीर ठरले. दुसऱ्या सामन्यात नागपूरच्या महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाने सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठावर सहा गडी राखून मात केली. सोलापूरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी घेतली. त्यांनी २० षटकांत नऊ बाद १४३ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल नागपूरने १९ षटकांत चार बाद १४६ धावा केल्या. संदीप रिंधे सामनावीर ठरले. दुपारच्या सत्रातील पहिल्या सामन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ-ब संघाला ८८ धावांनी पराभूत केले. पुणे विद्यापीठाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. त्यांनी २० षटकांत पाच बाद १७९ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाचा संघ १५.३ षटकांत ९१ धावाच करू शकला. मनीष गायकवाड सामनावीर ठरले. दुसऱ्या सामन्यात नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठावर परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठावर ६५ धावांनी विजय मिळविला. परभणीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी घेतली. प्रथम फलंदाजी करताना नांदेडने २० षटकांत पाच बाद १८७ धावा केल्या. परभणी संघाला प्रत्युत्तरादाखल खेळताना २० षटकांत १० बाद १२२ धावा करता आल्या. पी. एम. मुपडे सामनावीर ठरले.

तरूण भारत

# मुंबई, पुणे, नागपूर, नांदेडचे दणदणीत विजय

- राज्य आंतर विद्यापीठ कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

प्रतिनिधी
कोल्हापूर

महाराष्ट्र राज्यआंतर विद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत पाचव्या दिवशी झालेल्या सामन्यात मुंबई, नागपूर, पुणे आणि नांदेड विद्यापीठांच्या संघांनी प्रतिस्पर्धी संघावर दणदणीत विजय मिळविले. शिवाजी विद्यापीठातील मैदानावर या स्पर्धा सुरू आहेत.

**मुंबई विद्यापीठाचा सहज विजय**

सकाळच्या सत्रात मुंबई विद्यापीठ व जळगाव येथील कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ यांच्यात पहिला सामना झाला. जळगावने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत १८.३ षटकात सर्व बाद ११६ धावा केल्या. जितेंद्र पाटील यांनी ३० तर अभिमन्यू पवार व श्याम कुमावत यांनी प्रत्येकी १६ धावा केल्या. मुंबईच्या संजय पवार यांनी ४ व श्रीकांत मोंडे यांनी २ बळी घेतले. मुंबई विद्यापीठाने ३ गड्यांच्या मोबदल्यात ९.४ षटकातच १२० धावा करत दणदणीत विजय मिळवला. अनिल धडशी यांच्या ६८ तर संजय पवार व सुशांत घाडी यांनी (नाबाद) प्रत्येकी २१ धावांचा केल्या. सामन्यात मुंबईच्या संजय पवार यांना सामनावीराने गौरविले.

**नागपूरचा ६ गड्यांनी विजय**

सकाळच्या सत्रात नागपूरच्या महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ व सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात नागपूरने सहा गड्यांनी विजय मिळवला. सोलापूरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत २० षटकात ९ बाद १४३ धावा केल्या. पंकेश कनमाने यांनी नाबाद २९, मुख्तार शेख यांनी २७ व प्रशांत पुजारी यांनी २० धावा केल्या. नागपूरच्या संदिप रिघे आणि विठ्ठल धाईगुडे यांनी प्रत्येकी ३ बळी घेतले. प्रत्युत्तरादाखल खेळताना नागपूरने १९ षटकात ४ बाद १४६ धावा केल्या. त्यात सतीश यादव यांच्या नाबाद ३३ व अतुल ढोक यांच्या नाबाद ३१ धावांचा समावेश राहिला. संदीप रिघे सामनावीर ठरले.

**पुणे विद्यापीठाचा ८८ धावांनी विजय**

दुपारच्या सत्रातील पहिला सामना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विरुद्ध शिवाजी विद्यापीठ-ब यांच्यात झाला. हा सामना पुण्याने ८८ धावांनी जिंकला. पुणे विद्यापीठाने प्रथम फलंदाजी करत २० षटकात ५ बाद १७९ धावा केल्या. मनीष गायकवाड यांनी ५० व दिपक गजरमलने ३५ धावा केल्या. शिवाजी विद्यापीठाच्या दिपक कांबळे यांनी ३ गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल खेळताना शिवाजी विद्यापीठ 'ब' संघ १५.३ षटकात ९१ धावातच गुंडाळाला. पुण्याच्या मनिष गायकवाड यांनी ३ व बसवंत गजलवा, सुनिल माटे यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. मनिष गायकवाड सामनावीर ठरले.

**मराठवाडा विद्यापीठाचा ६५ धावांनी विजय**

नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, व परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामन्यात नांदेडने ६५ धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना नांदेडने ५ बाद १८७ धावा केल्या. त्यात नारशी कागडा यांच्या ५८ धावा व पी.एम. मुपडे यांच्या ३४ धावा होत्या. परभणी संघ प्रत्युत्तरादाखल खेळताना सर्वबाद १२२ धावापर्यंत मजल मारू शकला. नांदेडच्या मुपडे व शैलेश यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. पी.एम. मुपडे सामनावीर ठरले.

लोकमत

# मुंबई, नागपूर, पुणे, नांदेड विजयी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ कर्मचारी कुलगुरु चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत शुक्रवारी मुंबई, नागपूर, पुणे आणि नांदेड या विद्यापीठांच्या संघांनी प्रतिस्पर्धी संघावर मात केली.

पहिल्या सामन्यात मुंबई विद्यापीठाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचा सात गडी राखून पराभव केला. दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूरने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचा सहा गडी राखून पराभव केला. तिसऱ्या सामन्यात सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाने शिवाजी विद्यापीठ (ब) संघाचा ८८ धावांनी पराभव केला. चौथ्या सामन्यात परभणी संघाने नांदेड संघाचा पराभव केला.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २९ मार्चला

## सहस्रबुद्धे, चंद्रकांत पाटील प्रमुख पाहुणे

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या राजीनाम्यामुळे आणि शिक्षकेतर संघटनेच्या संपामुळे लांबणीवर पडलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाला कुलपती कार्यालयाने हिरवा झेंडा दाखविला. नवे राज्यपाल रमेश बैस यांच्या अध्यक्षतेखाली हा ५९ वा दीक्षांत समारंभ सोहळा २९ मार्चला होणार आहे. यासंदर्भातील पत्रव्यवहाराला कुलपती कार्यालयांकडून मंजुरी मिळाली असून तसे पत्र विद्यापीठ प्रशासनाला मिळाले आहे.

विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ १६ फेब्रुवारीला होणार होता. यासाठी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल



रिलेशनचे अध्यक्ष माजी खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित केले होते. हेच पाहुणे २९ मार्च रोजीच्या दीक्षांत समारंभासाठी उपस्थित असतील.

विद्यापीठातील ६६ हजार ४५७ विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. कार्यक्रमाच्या निमंत्रणपत्रिकांची छपाई, कार्यक्रमाची रूपरेषा आणि ग्रंथमहोत्सवाची तयारी याची कामे सुरू झाली आहेत.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा २९ रोजी दीक्षांत समारंभ

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ २९ मार्च रोजी होणार आहे. माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या राजीनाम्यामुळे आणि शिक्षकेतर संघटनेच्या संपामुळे १६ फेब्रुवारी रोजी होणारा दीक्षांत समारंभ स्थगित केला होता. दीक्षांत समारंभाची तारीख ठरली असली तरी प्रमुख पाहुणे अद्याप न ठरल्याचे विद्यापीठ प्रशासनातर्फे स्पष्ट करण्यात आले.

विविध प्रलंबित मागण्यांसाठी विद्यापीठीय शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परीक्षा कामकाजावर बहिष्कार आंदोलन पुकारले होते. त्या पार्श्वभूमीवर दि. १६ फेब्रुवारी रोजी होणारा विद्यापीठ प्रशासनाने दीक्षांत सोहळा स्थगित करण्याचा निर्णय घेतला होता. या दीक्षांत समारंभासाठी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे प्रमुख पाहुणे होते. माजी कुलपती तथा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी अध्यक्षस्थानी निश्चित झाले होते. विद्यापीठाने ६६ हजार ४५७ पदवी प्रमाणपत्रांची छपाई पूर्ण केली होती. दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू असताना अचानक दीक्षांत समारंभ स्थगित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला. तेव्हापासून दीक्षांतच्या नवीन तारखेकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागलेले होते. अखेर दि. २९ मार्च रोजी दीक्षांत समारंभ घेण्यास कुलपती कार्यालयाने मान्यता दिली.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २९ रोजी

- कुलपती कार्यालयाकडून मान्यता
- अध्यक्षस्थानी राज्यपाल रमेश बैस

प्रतिनिधी
कोल्हापूर

विविध कारणांमुळे शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने दीक्षांत समारंभाला स्थगिती दिली होती. आता त्याची तारीख निश्चित झाली असून, २९ मार्च रोजी शिवाजी विद्यापीठाचा ५९ वा दीक्षांत समारंभ होणार आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल तथा कुलपती रमेश बैस उपस्थित राहणार आहेत. याबाबत विद्यापीठ प्रशासनाला कुलपती कार्यालयाकडून पत्र मिळाले आहे.

यापूर्वी विद्यापीठ प्रशासनाने १६ फेब्रुवारी रोजी दीक्षांत समारंभ घेण्याचे निश्चित केले होते. त्यासाठी इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशनचे अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार होते. यासाठी ६६ हजार ४५७ पदवी प्रमाणपत्रांची छपाई केली होती. विद्यापीठ प्रशासनाने काही अपरिहार्य कारणांमुळे १३ फेब्रुवारी रोजी दीक्षांत समारंभाला स्थगिती दिली होती. नवे राज्यपाल रमेश बैस यांनी पदभार स्वीकारल्यानंतर समारंभाचे आयोजन आणि त्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठ प्रशासनाने कुलपती कार्यालयाला पत्र पाठविले. त्यांच्या उत्तराच्या प्रतीक्षेत असणाऱ्या विद्यापीठ प्रशासनाला कुलपती कार्यालयाकडून नुकतेच पत्र प्राप्त झाले आहे. या पत्रात दीक्षांत समारंभासाठी २९ मार्च ही तारीख निश्चित केली आहे.

लोकमत

# विद्यापीठाच्या दहा परीक्षांचे निकाल जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर-२०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या दहा परीक्षांचे निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आले. दरम्यान, दिवसभरात मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ आर्किटेक्चर या अभ्यासक्रमाच्या परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने पार पडल्या. सांगलीत परीक्षा केंद्रावरील एक गैरप्रकारही भरारी पथकाने उघडकीस आणला.

शिवाजी विद्यापीठाने एमएस्सी जिऑलॉजी, एमएस्सी एन्व्हायर्नमेंट सायन्स, एमएसस्सी शुगर टेक्नॉलॉजी, एमएसस्सी फूड सायन्स ॲन्ड न्यूरेशन, पीजी डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन या अभ्यासक्रमांचे पहिले सेमिस्टर, बीकॉमचे तिसरे सेमिस्टर, बीटेकचे पाचवे, सहावे सेमिस्टरसह १० अभ्यासक्रमांचे निकाल घोषित झाले.

# ‘कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र’ने भारावले रसिक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

‘शंभराव्या प्रयोगाची मांड पहिल्यातच बसूदे, फुटूदे तरी इंद्रधनुष्य नवनवीन प्रयोगा-प्रयोगी एक तरी क्षण जिवंत होऊदे... असूदे भान सतत जागं, माझं मलाच विंगेतून पाहता येऊदे... घडता घडता नाटक सहज घडूदे... पडदा नेहमी नेमका पडूदे...दिपवू नकोस डोळे अंधारातून प्रकाशात, जगण्याच्या गदारोळात सहज मिसळता येऊदे... रस्ता आणि पाय मला दोन्ही आवडूदेत... शेवटी माझा मला मी पुन्हा एकदा सापडूदे...’ अशी ‘नटराजाप्रती एका नटाची प्रार्थना’ या स्वरचित कवितेने सुप्रसिद्ध कवी सौमित्र तथा अभिनेते किशोर कदम यांनी ‘कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र’ या त्यांच्या काव्य-नाट्याची नांदी शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात केली आणि पुढची



सादरीकरण करताना अभिनेते किशोर कदम तथा कवी सौमित्र.

५० मिनिटे आपल्या सादरीकरणाने उपस्थित रसिकांना खिळवून ठेवले. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाच्या कवी कुसुमाग्रज स्मृती व्याख्यानमालेचे.

मराठी अधिविभागाने व्याख्यानमालेअंतर्गत कवी सौमित्र यांना विषय दिला ‘कुसुमाग्रजांच्या शोधात... सौमित्र.’ मात्र, या विषयाने कवी सौमित्र यांच्या संवेदनशील मनाला वेगळीच दिशा दिली आणि त्यातून एक आगळा काव्य-नाट्याविष्कार साकार झाला, ज्याची प्रथम अनुभूती घेत असताना वि. स. खांडेकर भाषा भवन सभागृहात उपस्थित असलेला प्रत्येक रसिक श्रोता त्या काव्य-नाट्यानुभवात चिंब भिजून गेला, रोमांचित झाला.

या सादरीकरणामध्ये कवी कुसुमाग्रज आणि नाटककार वि. वा. शिरवाडकर या दोघांमधला धागा उलगडण्याचा प्रयत्न करत असतानाच कवी सौमित्र यांनी आपले काव्यविश्व, अभिनय आणि रंगभूमी यांच्याशी त्यांचे नाते जोडून पाहण्याचा प्रयत्न अत्यंत गांभीर्यपूर्वक केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. रणधीर शिंदे यांनी परिचय करून दिला.